# विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालय

रामबाग फॉरेस्ट कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर - 442401 (म.रा.)

दुरध्वनी क्र. 07172-270448 फॅक्स नं. 07172-270448 E-mail :- dfochandrapur@gmail.com

**विषय** :- Proposal for diversion of 0.20 Ha. Forest Land under Forest (Conservation) Act 1980 for Opencast mining of Bhatadi Expansion Opencast Project of M/s. Western Coalfields Limited, Chandrapur Area.

**क्रमांक** :- कक्ष-14/सर्व्हे/जमीन/ 2413

चंद्रपूर, दिनांक 28/1/2019

**प्रति,**

क्षेत्रीय महाप्रबंधक,

चंद्रपूर क्षेत्र,

बाबुपेठ, जि. चंद्रपूर.

**संदर्भ** :- 1. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक WCL/CHA/AGM/PLG/REV/3188, दिनांक 10/12/2018.

2. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक WCL/CHA/AGM/PLG/REV/3518, दिनांक 07/01/2019.

3. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक WCL/CHA/AGM/PLG/REV/3564, दिनांक 11/01/2019.

आपले संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये विषयांकीत प्रस्ताव 5 प्रतीत प्राप्त झालेले आहे. प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रूट्या निदर्शनास आलेल्या आहे. त्याची पूर्तता करण्यांत यावी.

1. आपले संदर्भिय पत्र क्रमांक 2 अन्वये प्राप्त् अभिलेखाप्रमाणे प्रस्तावित वनक्षेत्र हे संरक्षित वन नसून झुडपी जंगल क्षेत्र आहे याची खात्री करण्यांत आलेली आहे. तेव्हा प्रस्तावात Legal Status मध्ये मौजा पायलीभटाळी, सर्व्हे क्रमांक 251, क्षेत्र 0.20 हे. संरक्षित वनाऐवजी झुडपी जंगल असे नमूद करण्यांत यावे.
2. मायनिंग लीज क्षेत्रातील वन व वनेत्तर क्षेत्राचे सातबारा आपले संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये तपासणीकरीता सादर करण्यांत आलेले आहे. सदर सातबारांची तपासणी केली असता त्यात खाजगी शेतमालकाकडून आपण जमीन अधिग्रहीत केल्यानंतरचे सातबारा सादर करण्यांत आलेले आहे. त्यामुळे सर्व सातबारावर WCL ची मालकी दर्शविण्यांत आलेली आहे. त्यामुळे सदर क्षेत्र खाजगी मालकीचे किंवा सरकारी मालकीचे याचा बोध होत नाही. तसेच Area Statement मध्ये Government Land असे नमूद करून क्षेत्र दर्शविण्यांत आले आहे. परंतू त्याचे सातबारा जोडलेले नाही. त्यामुळे सरकारी जमीन वन किंवा वनेत्तर जमीन आहे हे तपासणे शक्य होत नाही. त्यामुळे आपले

प्रतिनिधी यांना सातबारा तपासणीच्या वेळेस देण्यांत आलेल्या सूचनांप्रमाणे Area Statement प्रमाणे संपूर्ण लीज क्षेत्रातील खाजगी व सरकारी मालकी दर्शविणारे सर्व्हे नंबरचे सातबारा गांवनिहाय, सर्व्हे नंबरनिहाय अनुक्रमामध्ये लावण्यांत येवून Area Statement प्रमाणे क्षेत्र नकाशात खाजगी, सरकारी मालकीचे, नाला, रस्ता, आबादी व वनक्षेत्र असे वेगवेगळ्या रंगात दर्शवून नकाशासह सादर करण्यांत यावे व क्षेत्र तपासणीकरीता सहाय्य करणेबाबत आपले प्रतिनिधी यांना सूचित करावे. वरीलप्रमाणे कार्यवाहीकरीता सादर करण्यांत आलेले सातबारा परत करण्यांत येत आहे.

3. CMPDI द्वारा मान्यता प्राप्त मायनिंग लीजचे क्षेत्र दर्शविणारा नकाशा सादर करण्यांत यावा व त्याप्रमाणे मायनिंग लीज बाऊंड्री प्रस्तावात जोडण्यांत आलेल्या नकाशात दर्शविण्यांत आलेली आहे याची खात्री करण्यांत यावी. तसेच वेळोवेळी केंद्र शासनाच्या अधिसूचनेप्रमाणे निर्धारित करण्यांत आलेले मायनिंग लीजचे क्षेत्र नकाशात दर्शविण्यांत येवून नकाशा सोबत जोडण्यांत यावा.

वरील पूर्ततेकरीता प्रस्ताव 5 प्रतीत मायनिंग प्लॅन, सातबाराचे नस्तीसह परत करण्यांत येत आहे.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे.

**विभागीय वन अधिकारी,**

**चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर**

**प्रतिलिपी** :- मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सविनय सादर.